# गडचिरोली जिल्हयातील शहरीकरणाचा तेथील पर्यावरणावर होणारा परिणाम

**डॉ. प्रशांत व्हि. बुराडे**
भूगोल विभागप्रमुख
डॉ.अरुण मोटघरे महाविद्यालय,
कोंढा–कोसरा,ता.पवनी,जि.भंडारा

**सारांश** :–

जगामध्ये औद्योगिक क्रांतीनंतर मोठया प्रमाणात यांत्रीकीकरण झाले. तसेच नविन–नविन शोध लागले. त्यामुळे इतर क्षेत्रासोबतच वैद्यकीय क्षेत्रात खुप मोठी क्रांती झाली.त्याचा परिणामस्वरूप मृत्यूदर कमी झाला व जन्मदर स्थिर राहीला. त्यामुळे जगाची लोकसंख्या झपाटयाने वाढली.तसेच मोठे–मोठे शहरे सुध्दा निर्माण झाले. भारतात सुध्दा हिच परिस्थीती आहे. भारतात अनेक महानगरे, नगरे निर्माण झालीत व त्याचा परिणाम पर्यावरणावर झाला. गडचिरोली जिल्हयात सुध्दा अनेक लहान–लहान शहरे निर्माण झाली. ती शहरे आपला विकास करू लागली व त्याचा विपरीत परिणाम पर्यावरणावर होवू लागला.

**प्रस्तावना**:–

औद्योगिक क्रांतीनंतर तंत्रज्ञानासोबतच वैद्यकीय क्षेत्रातसुध्दा मोठया प्रमाणात क्रांती झालेली आहे. ही वैद्यकीय क्रांती फक्त महानगरापुरताच मर्यादित नाही तर लहान–लहान शहरातसुध्दा पहावयास मिळत आहे. त्यामुळे मृत्यूचा प्रमाण कमी झालेला आहे. पण त्या तुलनेने जन्मप्रमाण कमी झालेले नाही, त्यामुळे जगासोबतच भारतातही लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या मूलभूत गरजा ग्रामीण भागात पूर्ण होवू शकत नसल्यामुळे ग्रामीण भागातील नागरीक शहरी भागाकडे स्थलांतरीत होत आहेत. त्यामुळे शहरी भागातील लोकसंख्या या स्थलांतरामुळे पुन्हा वाढत आहे.

लोकसंख्येचे अधिक प्रमाणात केंद्रीकरण ज्याठिकाणी होते अशा वस्तीला नगर असे संबोधण्यात येते. अशा वस्तीमध्ये अनेक लोक लहानशा जागेत एकत्रीत राहत असल्याने तेथे लोकसंख्येची घनताही अधिक असते.

गडचिरोली जिल्हयात सुध्दा २०११ च्या जनगणनेनुसार सहा शहरे अस्तीत्वात आहेत. ही सहा नगरे जिल्हयातील अनेक गावांचा प्रतिनिधीत्व करतात. अनेक लहान–मोठया वस्त्या विविध सेवा सुविधांच्या बाबतीत या शहरावर विसंबून असतात. या शहराचे आकर्षण ग्रामीण भागातील नागरीकांना असल्यामुळे अनेक ग्रामीण नागरीक विविध निमीत्ताने या शहरात स्थलांतरीत होत आहेत. त्यामुळे या शहरावर या स्थलांतरीत नागरीकांचा दबाव पडत असल्यामुळे अनेक समस्या सोबतच पर्यावरणीय समस्यासुध्दा निर्माण झालेल्या आहेत.

**अभ्यासप्रदेश** :–

संयुक्त चंद्रपूर जिल्हयाची २६ ऑगष्ट १९८२ यादिवशी विभागणीकरून गडचिरोली जिल्हयाची निर्मीती करण्यात आली. गडचिरोली हा जिल्हा मागासलेला, आदिवासी व नक्षलगस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्हयाच्या पश्चिम सिमेवरून वैनगंगा हि नदी वाहते व जिल्हयाच्या पश्चिम सिमेच्या मध्यभागामध्ये वैनगंगा नदिला वर्धा नदी येवून मिळते. या दोन नदयांच्या संगमानंतर या नदयांच्या संयुक्त प्रवाहाला प्राणहिता नदी म्हणून ओळखल्या जाते. जिल्हयाचा पूर्व भाग हा डोंगराळ व जंगलव्याप्त आहे. पूर्वकडे टेकडयांचा प्रदेश, पश्चिम व

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-I JANUARY 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

दक्षिणेकडे नदयांची खोरी व या दोघांच्यामध्ये उतार असे या जिल्हयाचे स्वरूप स्पष्ट आहे. या जिल्हयाचे अक्षवृत्तीय स्थान १८°४१’ उत्तर ते २०°५०’ उत्तर आहे तर रेखावृत्तीय स्थान ७९°४६’ पूर्व इतके आहे. या जिल्हयाचे एकुण क्षेत्रफळ १४४१२ चौ.किमी. इतके आहे. या जिल्हयाची एकुण लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १०७२९४२ आहे. येथे लोकसंख्येची घनता ७४.४५ इतकी आहे. या एकुण लोकसंख्येपैकी ११८०३३ लोकसंख्या नागरी तर ९५४९०९ लोकसंख्या ग्रामीण अहे. या जिल्हयाचा लिंग गुणोत्तर ९८२ इतका आहे. जिल्हयाच्या एकुण लोकसंख्येत ४१५३०६ इतकी आदिवासींची संख्या आहे. गडचिरोली जिल्हयात २०११ च्या जनगणनेनुसार सहा शहरे आहेत.

**उद्देश** – गडचिरोली हा मागासलेला जिल्हा आहे, जिल्हयाच्या शहरांचा तेथील पर्यावरणावर होणारा परिणामाचा अभ्यास करणे हा मुळ उद्देश आहे.

**अभ्यास पध्दती :–**

प्रस्तुत शोधनिबंध हा पुर्णत: व्दितीयक माहितीवर आधारीत आहे. जनगणना पुस्तीका, आर्थिक व सामाजिक समालोचन, चांदा जिल्हा गॅझीटीयर, विविध शासकिय कार्यालय यांच्याकडे उपलब्ध असलेली आकडेवारी संकलीत करण्यात येवून त्या आकडेवारीचे विश्लेषण करण्यात आले.

**गडचिरोली जिल्हयातील शहरे :–**

गडचिरोली जिल्हा अनेक लहान मोठया वस्त्या, गांव व शहराने बनलेला आहे. परंतु या जिल्हयात एकुण सहा शहरे आहेत, ते पुढील पुढील प्रमाणे आहेत.

**अ) गडचिरोली**

गडचिरोली हा जिल्हयातील महत्वाचा शहर असुन जिल्हा केंद्र आहे. गडचिरोली शहराला १९८२ मध्ये जिल्हा केंद्र म्हणून मान्यता देण्यात आली. गडचिरोलीचा अक्षवृत्तीय स्थान २०°१३’ उत्तर व रेखावृत्तीय स्थान ८०°१०’१५’’ पूर्व आहे. या शहराचा क्षेत्रफळ २९.३ चौ. किमी आहे. गडचिरोली शहर गडचिरोली, रामपूर (तूकूम), विसापूर, लांजेडा, सोनापूर व देवापूर ही खेडे एकत्र करून बनले आहे. या शहराच्या पश्चिमेकडून काही अंतरावरून वैनगंगा हि नदी वाहते तर उत्तरेकडून खोब्रागडी हि नदी वाहते. शहराच्या पूर्व व आग्नेय भागात घनदाट जंगल आहे.




गडचिरोली शहराची लोकसंख्या १९८१ मध्ये १०८४४ होती. ती लोकसंख्या जिल्हाकेंद्र झाल्यानंतर मोठया प्रमाणात वाढलेली आहे. १९९१ मध्ये लोकसंख्या २९५६५ झाली. २००१ मध्ये ४२४६८ झाली तर २०११ मध्ये लोकसंख्या ५४१५२ इतकी झाली.

गडचिरोली हे जिल्हा केंद्र असल्यामुळे येथे अनेक शासकिय कार्यालय निर्माण झालेली आहेत.

**ब) देसाईगंज (वडसा)**

देसाईगंज हे शहर गडचिरोली जिल्हयातील दुसऱ्या क्रमांकाचे महत्वाचे शहर आहे. या शहराचा अक्षवृत्तीय स्थान २०°१३' उत्तर व रेखावृत्तीय स्थान ८०°१०'५'' पूर्व आहे. वैनगंगा नदिच्या डाव्या किनाऱ्यावर २ किमी अंतरावर हे शहर वसलेले आहे. शहराच्या उत्तरेला खोब्रागडी नदी वाहते. या शहराच्या पूर्व व आग्नेय भागात धनदाट जंगल आहे. हे शहर रस्त्याच्या संगमावर वसलेले असून या शहरातून गोंदिया चंद्रपूर रेल्वेमार्ग जातो. या शहराचे क्षेत्रफळ २६.७ चौ. किमी आहे. देसाईगंज हे शहर वडसा, नैनपूर व विर्सी–तूकुम ही गावे एकत्रकरून निर्माण झालेले आहे.

देसाईगंज हे महत्वाचे व्यापारी केंद्र आहे. संपूर्ण जिल्हयात कपडा बाजारपेठेसाठी हे शहर प्रसिध्द आहे. तसेच तेथे अनेक महत्वाचे लहान–मोठे उद्योग निर्माण झालेले आहेत उदा. कागदकारखाना, धानगिरणी, पोहाकारखाना, मुरमुरा कारखाना, इ. या शहराची लोकसंख्या सन २०११ मध्ये २८७८१ होती. देसाईगंज शहरामध्ये १९८१ मध्ये १५५०३ लोकसंख्या होती, ती उत्तरत्तर वाढत गेलेली आहे. १९९१ मध्ये १९७९४, २००१ मध्ये २४७९३ लोकसंख्या होती.

**क) कुरखेडा –**

२०११ च्या जनगणनेनुसार या गावाला शहराचा दर्जा मिळाला. या शहराचा अक्षवृत्तीय स्थान २०°३७' उत्तर व रेखावृत्तीय स्थान ८०°१२' पूर्व आहे. या शहराचा क्षेत्रफळ ४.९३ चौ किमी आहे. हा शहर पूर्णपणे जंगलव्याप्त आहे. या शहराची लोकसंख्या २०११ नुसार ७४३० आहे. या शहरात अजुनही पाहिजे त्या प्रमाणात सेवा सुविधांचा विकास झालेला नाही.

**ड) आष्टी –**

चामोर्शी तालुक्यातील या गावाला २०११ च्या जनगणनेनंतर शहराचा दर्जा मिळाला. या शहराचा अक्षवृत्तीय स्थान १९°९' उत्तर व रेखावृत्तीय स्थान ७९°८' पूर्व असा आहे. या शहराचा क्षेत्रफळ २.१० चौ. किमी आहे. हा शहर पुर्णपणे जंगलव्याप्त आहे या शहराची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ५६३४ इतकी आहे. या शहरात सेवा–सुविधांचा अभाव आहे.

**इ) अहेरी –**

प्राणहिता नदिजवळ हे शहर वसलेले आहे. या शहरालासुध्दा २०११ मध्ये शहराचा दर्जा मिळाला. या शहराचा अक्षवृत्तीय स्थान १९°२३' उत्तर व रेखावृत्तीय स्थान ८०°१' पूर्व आहे. या शहराचा क्षेत्रफळ ९.५३ चौ. किमी आहे. हा शहर जंगव्याप्त असुन या शहराची लोकसंख्या १४६०९ आहे. हा शहर विकासापासुन खुप दूर आहे.

**ई) सिरोंचा –**

जिल्हयाच्या अतिदुर्गम भागात असणारा हा शहर आहे. या शहराला शहराचा दर्जा २०११ मध्ये मिळाला. हा शहर प्राणहिता नदिच्या किनाऱ्यावर वसलेला आहे. या शहराचा अक्षवृत्तीय स्थान १८°८४' उत्तर व रेखावृत्तीय स्थान ८०°१२' पूर्व आहे. या शहराचा क्षेत्रफळ २.७१ चौ. किमी आहे. या शहराची लोकसंख्या ७४२७ आहे. हा शहर जंगलव्याप्त असुन विकासापासून खुपच दुर आहे.

❖ **गडचिरोली जिल्हयातील शहरीकरणाचा तेथील पर्यावरणावर होणारा परिणाम:**

गडचिरोली जिल्हयात एकुण सहा शहरे आहेत. ही शहरे विकासाच्या प्राथमिक अवस्थेत आहेत. पण ही शहरे विकासाकरीता प्रयत्नशिल आहेत. या शहराचा जसजसा विकास होत जाईल तसतसा येथिल पर्यावरणावर त्याचा गंभिर परिणाम आढळून येईल. या शहरांचा पर्यावरणावर पूढील प्रमाणे परिणाम झालेला पहावयास मिळतो.

**१) ध्वनीप्रदूषण –**

या नवनिर्मीत शहरामध्ये मोठया प्रमाणात वाहनांची संख्या वाढत आहे. त्यामुळे तेथे ध्वनी प्रदूषणाची समस्या जानवायला लागलेली आहे.

**२) वायूप्रदूषण –**

गडचिरोली व देसाईगंज या शहरांमध्ये अनेक लहान–मोठे उद्योग स्थापन होत आहेत. त्यामुळे या उद्योगातून विषारी वायू सोडण्यात येवू लागलेला आहे. त्याच्या परिणाम स्वरूप या शहरांमध्ये वायूप्रदूषणाची समस्या उत्पन्न होवू लागलेली आहे.

**३) जलप्रदूषण –**

ग्रामीण भागातील नागरीक विविध कारणाने या लहान शहराकडे आकर्षीत होवू लागलेले आहेत त्यामुळे या शहरांच्या लोकसंख्येत वाढ होत आहे. नागरीक विविध कारणांसाठी पाणी वापर करीत आहे. वापरलेला दूषित पाणी या शहरांच्या जवळपासच्या तलावांमध्ये, नदयांमध्ये सोडण्यात येत आहे. त्यामुळे ही जलाशये दूषीत व्हायला लागली आहेत.

**४) वृक्षतोड –**

या नवनिर्मीत शहरामध्ये विकासकार्यांना सुरवात झालेली आहे. त्यामुळे मोठया प्रमाणात वृक्षतोड सुरू झालेली आहे.

**५) भूजलपातळीत घट –**

या शहरांची लोकसंख्या वाढत आहे तसेच विकासकामांना सुध्दा सुरवात झालेली आहे. त्यामुळे भूजलातील पाण्याचा वापर मोठया प्रमाणात होवू लागलेला आहे. त्याचा परिणाम स्वरूप भूजलाच्या पातळीत घट होत आहे.

**६) जैवविविधतेचा ऱ्हास –**

गडचिरोली जिल्हयातील बहुतांश शहरे जंगलव्याप्त आहेत किंवा जंगलाच्या जवळपास आहेत. या शहरांची लोकसंख्या वाढत आहे तसेच विकासकामे सुध्दा होत आहेत. त्यामुळे जैवविविधतेचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे ऱ्हास होत आहे.

**७) कृषीभूमीचा ऱ्हास –**

या शहरांमध्ये लोकसंख्या वाढत आहे. ही वाढती लोकसंख्या आपल्या निवासाची सोय करण्याकरीता कृषीभूमीचा वापर करीत आहेत. त्यामुळे कृषीभूमीचा ऱ्हास झपाटयाने होवून तथे वसाहती बनत आहेत.

**निष्कर्ष** :–

गडचिरोली हा जिल्हा मागासलेला जिल्हा आहे. या जिल्हयातील शहरे आपल्या विकासाच्या प्राथमिक अवस्थेत आहेत पण हि शहरे विकास करण्याकरीता धडपडत आहेत. त्यामुळे या शहरांचा पर्यावरणावर सध्यातरी फारसा विपरीत परिणाम झालेला नाही पण हि शहरे ज्यावेळी विकासाच्या मार्गावर वेगाने धावतील तेव्हा त्याचा विपरीत परिणाम पर्यावरणावर झालेला आढळून येईल.

**संदर्भग्रंथ :–**

१. डॉ.के.म. भांडारकर, पर्यावरणशिक्षण, नित्यनुतन प्रकाशन पुणे (२००७).
२. डॉ. विठ्ठल घारपूरे, वस्ती भूगोल, पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर (२०१३).
३. डॉ. विठ्ठल घारपूरे, महाराष्ट्राचा भूगोल, पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर (२०१२).
४. डॉ. विठ्ठल घारपूरे, नागरी भूगोल, पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर (२०१३).
५. डॉ. विठ्ठल घारपूरे, पर्यावरण भूगोलशास्त्र, पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर (१९९१).
६. अ.ज. राजुरकर, चंद्रपूरचा इतिहास, महाकाली प्रकाशन, चंद्रपूर प्र.आ. (१९५६).
७. चांदा डिस्ट्रीक्ट गॅझेटियर (२००५).
८. गडचिरोली जिल्हा जणगणना पूस्तीका (२०११).
९. गडचिरोली जिल्हा आर्थिक व समाजीक समालोचन (२०११).

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com